निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
रविवार
२५ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### लाखो भाविकांसाठी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब व लंगर साहिब गुरुद्धाराकडून मोफत भोजन सेवा

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी/** नांदेड येथे हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी मोदी मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही दिवशी नांदेडमध्ये दाखल होणाऱ्या लाखो भाविकांच्या भोजनासाठी १२ भव्य लंगरची व्यवस्था करण्यात आली असून, ही सेवा तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा व लंगर साहिब गुरुद्वारा यांच्या वतीने पुरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमानिमित्त बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पार्किंग स्थळांपासून रेल्वे स्थानक, बसस्थानक व विमानतळ परिसरात विविध ठिकाणी मोफत सेवा स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. याशिवाय तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा तसेच गुरुद्वारा लंगर साहिब येथेही भाविकांसाठी भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच या दोन गुरुद्वारांद्वारे भव्य निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या मोफत लंगर सेवेचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर, नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी यांनी केले आहे.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, नागपूर विभागात देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रजासत्ताक दिनानिमित्त सहा महसूली विभागात गीत, नृत्य, नाट्य यांच्या सादरीकरणातून देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. वंदे मातरम् या देशभक्तीपर गीत व नृत्याविष्कारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी, रात्रौ ८:१५वा. रविंद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे करण्यात आले आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'वंदे मातरम्' हा देशभक्तीपर गीत व नृत्याविष्कार चा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात गायक राहुल गंगाधर जेठे, गायिका प्रिया सतिश पवार आणि भाग्यश्री अभ्यंकर व समुह, तसेच नृत्याविष्कार: फ्युजन इंस्टिट्यूट ऑफ डांस समुह, यांचा सहभाग असून प्रवेश विनामूल्य आहे तरी जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि आस्वाद घ्यावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

### महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ ची २४ फेब्रवारी २०२६ रोजी परतफेड

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.६७ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ अदत्त शिल्लक रकमेची २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत देय असलेल्या व्याजासह २४ फेब्रवारी २०२६ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे. 'परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर २४ फेब्रुवारी २०२६ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४ (३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.६७ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली, असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत. भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केले जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे.

## बीड हादरलं! रक्ताच्या नात्यात क्रूरता आणि मृत्यूचं गूढ; दोन घटनांनी जिल्हा सुन्न!

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** जिल्ह्यात गुन्हेगारांचा आणि मृत्यूचा हैदोस पाहायला मिळत आहे. एका बाजूला पोटच्या गोळ्यासारख्या पत्नीचा जीव घेऊन पतीने रचलेला 'हृदयविकाराचा' बनाव पोलिसांनी उधळून लावला, तर दुसरीकडे बिंदुसरा धरणाने एका २३ वर्षीय तरुणाचा घास घेतला आहे. या दोन्ही घटनांमुळे बीडमध्ये संतापाची लाट उसळली आहे.




**बायकोला संपवलं अन् रचला 'हार्ट अटॅक'चा बनाव; पोलिसांनी सरणावरुन आरोपी पतीला खेचलं! :** अंबाजोगाई तालुक्यातील हातोला गावात माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. सुरेश शेरफुले या नराधम पतीने किरकोळ वादातून आपली पत्नी शिलाबाई यांची काठीने ठेचून हत्या केली. क्रूरतेची सीमा म्हणजे, हत्या केल्यानंतर याने ढोंग रचले की पत्नीचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला आहे.

थेट स्मशानभूमीपर्यंत पोहोचला होता कावेबाज पती: गुन्हा लपवण्यासाठी तो मृतदेह घेऊन थेट नांदेड जिल्ह्यातील आलुरा या मूळ गावी पळाला. तिथे अंत्यसंस्काराची तयारीही झाली होती.

खाकीचा दणका: बर्दापूर पोलिसांनी मृत्यूचं गुपित ओळखून थेट अंत्यसंस्कारापूर्वीच तिथे धाड टाकली. मृतदेहाच्या डोक्यावरच्या जखमांनी या नराधमाचं पाप उघड केलं. पोलिसांनी त्याला सरणावरुन ताब्यात घेत बेड्या ठोकल्या आहेत.

**पोलिसांसमोर मोठे आव्हान!**
एकीकडे खुनी पतीचे भयानक कारस्थान आणि दुसरीकडे तरुणाचा संशयास्पद मृत्यू; बीड पोलीस या दोन्ही प्रकरणांचा मुळापर्यंत तपास करत आहेत. या घटनांनी पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

**बिंदुसरा धरणाच्या लाटांनी गिळलं तरुण आयुष्य; बेपत्ता 'संकेत'चा मृतदेह अखेर सापडला!** : पाली येथील २३ वर्षीय तरुण संकेत तुकाराम नवले याचा दोन दिवसांपासून सुरू असलेला शोध अखेर एका दुर्दैवी वळणावर थांबला. बिंदुसरा धरणाच्या पाण्यात त्याचा तरंगता मृतदेह सापडल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

चप्पल आणि कपडे ठरले मृत्यूचे साक्ष: संकेत बेपत्ता झाल्यानंतर धरणाच्या काठावर त्याचे कपडे आणि चप्पल सापडल्याने घातपाताचा संशय बळावला होता.

दोन दिवसांच्या शोध मोहिमेचा करुण अंत: शनिवारी सकाळी धरणाच्या पाण्यात संकेतचा मृतदेह तरंगताना दिसताच परिसरात खळबळ उडाली. बीड ग्रामीण पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

## ४०० कोटींची लूट आणि 'फॉर्च्युनर'मधून अपहरण

### निवडणुकीच्या धामधुमीत 'त्या' गुप्त खजिन्याचा पर्दाफाश!

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/ प्रतिनिधी/** राज्यात निवडणुकांचा फिव्हर असतानाच नाशिकमधून एक असा धक्कादायक प्रकार समोर आला आहे, ज्याने पोलीस प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दोन कंटेनरमधून जाणारे तब्बल ४०० कोटी रुपये लुटल्याचा खळबळजनक खुलासा एका तरुणाच्या अपहरणाच्या तपासातून झाला असून, यात मोठमोठे मासे अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



**विशेष पथकाची स्थापना**
प्रकरणाचं गांभीर्य ओळखून अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य निखेलकर यांनी विशेष तपास पथकाची (ड्खढ) स्थापना केली आहे. हे प्रकरण केवळ अपहरणाचे नसून ४०० कोटींच्या काळ्या पैशाच्या व्यवहाराचे आहे. यामागे नक्की कोणता 'मास्टरमाइंड' आहे, हे शोधण्याचे मोठे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

**चोरला घाटातला तो थरार: ४०० कोटींच्या जुन्या नोटा आणि लूट! :** या प्रकरणाचा केंद्रबिंदू १६ ऑक्टोबर रोजी कर्नाटकातील चोरला घाटात घडलेली एक गुप्त घटना आहे. गोव्याहून एका ट्रस्टकडे जाणारे दोन कंटेनर रात्रीच्या अंधारात लुटण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे या कंटेनरमध्ये २००० रुपयांच्या जुन्या नोटांचे ४०० कोटी रुपये होते. या पैशांचा मालक ठाण्यातील एक बडा बिल्डर असल्याची चर्चा असून, हा पैसा निवडणुकीसाठी वापरला जाणार होता का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

**पीडित संदीप पाटीलचा सोशल मीडियावरून खळबळजनक खुलासा :** संदीप पाटील या तरुणाने व्हिडीओ शेअर करत आपल्याला मिळालेल्या वागणुकीचा आणि लुटीचा पाढा वाचला आहे:

**अपहरणाचे नाट्य:** २२ ऑक्टोबरला मला चौकशीच्या नावाखाली घोटीला बोलावले आणि तिथून फॉर्च्युनर गाडीत जबरदस्तीने बसवून अपहरण केले.

**मारहाण आणि आरोप:** गाडीत विशाल नायडू आणि सुनील धुमाळ होते. त्यांनी मला बेदम मारहाण केली आणि तूच ४०० कोटींचे कंटेनर लुटले आहेस, असा बनावट आरोप माझ्यावर केला, असा दावा संदीपने केला आहे.

**राजकीय आणि बिल्डर लॉबीचा समावेश? ड्खढ कडून तपास सुरू!** या प्रकरणाचे धागेदोरे अत्यंत खोलवर गुंतलेले असून यात राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग असण्याची शक्यता आहे.

**५ अटकेत, २ फरार:** पोलिसांनी जयेश कदम, विशाल नायडू, सुनील धुमाळ, विराट गांधी आणि जनार्दन धायगुडे यांना अटक केली आहे.

## प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम आज दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे झाली. राजशिष्टाचार विभागाच्या उप सचिव क्रांती पाटील यांनी ध्वजवंदन केले. यावेळी अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पाण्डेय, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे उपस्थित होते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांच्या वतीने या रंगीत तालीम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी झालेल्या संचलनात भारतीय नौदल; गोवा पोलीस; राज्य राखीव पोलीस बल; बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र दल; बृहन्मुंबई पोलीस दंगल नियंत्रण पथक; बृहन्मुंबई सशस्त्र महिला पोलीस दल; मुंबई लोहमार्ग पोलीस दल; गडचिरोली व गोंदिया जिल्ह्याचे सी-६० पथक; गृह रक्षक दल (पुरुष); बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल; गृहरक्षक दल (महिला); राज्य उत्पादन शुल्क विभाग; वन विभाग: मुंबई अग्निशमन दल; बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल; सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा; राष्ट्रीय सेवा योजना (मुले/मुली); सी.कॅडेट कोअर (मुली); सी.कॅडेट कोअर (मुले); रोड सेफ्टी पेट्रोल (मुली) रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर मुंबई; रोड सेफ्टी पेट्रोल (मुले) सेंट पॉल हायस्कूल, दादर, मुंबई; रोड सेफ्टी पेट्रोल (मुली) सेंट पॉल कॉन्व्हेंट हायस्कूल, दादर, मुंबई; रोड सेफ्टी पेट्रोल (मुले) डॉ.अँटोनिओ डा सिल्वा हायस्कूल दादर, मुंबई; रोड सेफ्टी पेट्रोल, मनपा (मुली) वामनराव महाडिक उर्दू आणि पंतनगर मनपा इंग्रजी शाळा, घाटकोपर (पूर्व), मुंबई; रोड सेफ्टी पेट्रोल मनपा (मुले) जी.व्ही. स्कीम मुलुंड आणि क.दा. गायकवाड हिंदी शाळा, सायन भोईवाडा, मुंबई; भारत स्काऊट गाईड मनपा शाळा (मुली); भारत स्काऊट गाईड मनपा शाळा (मुले); स्टुडंट पोलीस कॅडेट (मुले/मुली) पुणे विद्याभवन पंतनगर आणि शिवाजी टेक्निकल स्कूल पंतनगर, मुंबई यांच्यासह पाईप बँड, महिला पाईप बँड, ब्रास बँड पथक, अश्वदल पोलीस पथक सहभागी झाले होते.

## महाराष्ट्रातील शेतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे: अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्रातील शेतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे, महिला शेतकऱ्यांसाठी शासन विविध योजना व उपक्रम राबवत असून शाश्वत शेतीसाठी कृषी विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन कृषी विभागासोबत शेतकरी महिलांच्या विकासासाठी काम करत आहे, असे कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सांगितले.



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने आणि एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री अतिथीगृह येथे महिला शेतकऱ्यांच्या विविध विषयाच्या अनुषंगाने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी बोलत होते.

या चर्चासत्रात एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामिनाथन, शेतकरी महिला प्रतिनिधी, विविध भागातून महिलांविषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदच्या महासंचालक वर्षा लड्डा, एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्त कैलास पगारे, उमेद- राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर,मुख्यमंत्री कार्यालयाच्या विशेष कार्यकारी अधिकारी प्रिया खान, विधी व न्याय विभागाचे संयुक्त सचिव मकरंद कुलकर्णी तसेच महिला किसान अधिकार मंच यांच्या सीमा कुलकर्णी यांनीही आपले विचार मांडले.

अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, मागील वर्षी भारतरत्न डॉ. प्रा. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जन्मशताब्दी निमित्त कृषी विभागाने त्यांच्या जन्मदिवसाला 'शाश्वत शेती दिन' म्हणून घोषित केले. शाश्वत शेती,पोषण सुरक्षा आणि महिला व पुरूष यांच्या शेतीतील कामातील समानता बळकट करण्यासाठी शासनाने एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन सामंजस्य करार केला आहे, या कराराच्या माध्यमातून शासन काम करत आहे असे ते म्हणाले.


## महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी 'बीग्सी' अभिनव, खर्चमुक्त उपक्रम: परिवहन आयुक्त विवेक भिमनवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महिला प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत गृह विभाग तसेच परिवहन विभागाच्या सहकार्याने बीग्सी हा अभिनव आणि खर्चमुक्त उपक्रम सुरू करण्यात येत असल्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी सांगितले. एका सामाजिक जाणिवेतून सुरू झालेला हा प्रकल्प भविष्यात महिला सुरक्षेचा नवा अध्याय लिहील, असा विश्वासही परिवहन आयुक्त भिमनवार यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्र पोलीस, मोटार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस आणि इटीएस ३६० टेक्नोलॉजी सोल्युशन यांच्या सहकाऱ्याने मुंबई तसेच राज्यभरातील काळी पिवळी टॅक्सी आणि ऑटोरिक्षाकरिता बीग्सी (बीवायजीएसवाय) या सेवेचा आरंभ परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्या हस्ते झाला. यावेळी सह परिवहन आयुक्त शैलेश कामत, वाहतूकचे उपआयुक्त अजित बोगार्डे, मुख्य प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील तसेच बीग्सीचे संस्थापक प्रा. निरंजन भट आदी उपस्थित होते.

परिवहन आयुक्त भिमनवार म्हणाले की, शहरीकरणाच्या प्रक्रियेत महिलांचा कामासाठीचा प्रवास वाढला असून त्यांच्या सुरक्षिततेबाबत कुटुंबीयांमध्ये कायम चिंता असते. दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर महिला सुरक्षेचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर गंभीरपणे घेतला गेला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रवासी




वाहनात 'व्हेईकल लोकेशन अँड ट्रॅकिंग डिव्हाइस' (व्हीएलटीडी) व पॅनिक बटन बसवणे बंधनकारक करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर इटीएस ३६० टेक्नोलॉजी सोल्यूशनचे संस्थापक प्रा. भट आणि त्यांच्या टीमने सामाजिक जबाबदारीतून कोणताही आर्थिक भार न टाकता महिलांना सुरक्षा देणारा पर्यायी उपाय विकसित केला. कोरोना काळातील अडचणी, प्रशासकीय नियमांचा अभाव आणि तांत्रिक आव्हाने असूनही त्यांनी हार न मानता हा प्रकल्प पुढे नेला. परिवहन विभाग, पोलीस यंत्रणा आणि कमांड कंट्रोल सेंटरशी एकात्मता साधत हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात आला असल्याचे आयुक्त भिमनवार यांनी सांगितले. हा उपक्रम सध्या ऐच्छिक असला तरी त्याची व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन परिवहन आयुक्त भिमनवार यांनी केले.

## संपादकीय

### महाराष्ट्राची वैश्विक भरारी - ३५ लाख संधी आणि विकासाचे नवे क्षितिज

**स्वित्झर्लंडमधील** दावोस येथे पार पडलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत (WEF) महाराष्ट्राने आपल्या औद्योगिक सामर्थ्याचा जो डंका वाजवला आहे, तो राज्याच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण मानावा लागेल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यासाठी तब्बल ३५ लाख नोकऱ्या आणि अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणुकीची केलेली घोषणा केवळ आश्वासक नसून, ती महाराष्ट्राला आधुनिक जगाच्या नकाशावर एक 'आर्थिक महासत्ता' म्हणून प्रस्थापित करणारी आहे. परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हेच भारताचे खरे 'गेटवे ऑफ इंडिया' असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

**गुंतवणुकीचे विकेंद्रित स्वरूप :** यावेळच्या दावोस दौऱ्याचे सर्वात मोठे यश म्हणजे गुंतवणुकीचे झालेले विकेंद्रीकरण. सहसा मोठी गुंतवणूक मुंबई किंवा पुण्यासारख्या शहरांत मर्यादित राहते. मात्र, गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त आणि मागास भागात २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणारा 'सूरजागड इस्पात' प्रकल्प हा राज्याच्या समतोल विकासाचा एक क्रांतिकारी अध्याय ठरेल. यामुळे केवळ गडचिरोलीचा चेहरामोहरा बदलणार नाही, तर तिथल्या ८,००० स्थानिक तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्याची संधी प्राप्त होईल. तसेच पालघर आणि मुंबई क्षेत्रातील ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक शाश्वत विकासाला चालना देणारी ठरेल.

'तिसरी मुंबई': भविष्यातील स्वप्ननगरी : मुंबईवरचा वाढता ताण कमी करण्यासाठी आणि नवी मुंबई विमानतळाचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यासाठी 'तिसरी मुंबई'ची (Third Mumbai) संकल्पना आता प्रत्यक्षात येत आहे. या भागात नियोजित असलेली 'एज्यु-सिटी', 'स्पोर्ट्स सिटी' आणि 'मेडिसिटी' ही केवळ नावे नसून, ती भविष्यातील तंत्रज्ञानावर आधारित सेवा क्षेत्राची हब आहेत. जेव्हा आपण २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो, तेव्हा अशा जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची उभारणी करणे ही काळाची गरज आहे. रिअल इस्टेट क्षेत्रात सुमिटोमो आणि रहेजा कॉर्पोरेशन सारख्या दिग्गज कंपन्यांनी दाखवलेला विश्वास या शहराच्या आर्थिक स्थिरतेची साक्ष देतो.

**रोजगारनिर्मितीचे अवाढव्य उद्दिष्ट :** ३५ लाख नोकऱ्यांची निर्मिती हे एक प्रचंड मोठे आव्हान आणि तितकीच मोठी संधी आहे. डीबीजी ग्रुपने लॉजिस्टिक क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या ४.५ लाख नोकऱ्या आणि रिअल इस्टेटमधील लाखो संधींमुळे महाराष्ट्रातील बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल. मात्र, या नोकऱ्यांसाठी आवश्यक असलेले कौशल्य (Skilling) आपल्या तरुण पिढीमध्ये विकसित करणे हे सरकार आणि शैक्षणिक संस्थांसमोरील मुख्य कर्तव्य असेल. 'इनोव्हेशन सिटी'च्या माध्यमातून संशोधन आणि तंत्रज्ञानाला मिळणारी चालना महाराष्ट्राला केवळ 'मॅन्युफॅक्चरिंग हब' न ठेवता 'नॉलेज हब' बनवेल.

**अंमलबजावणीची कसोटी :** दावोसमध्ये झालेले करार (चेणी) हे विकासाचे पहिले पाऊल आहेत. या करारांचे रूपांतर प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये आणि रोजगारांमध्ये होण्यासाठी 'इज ऑफ डुइंग बिझनेस'ला अधिक गती द्यावी लागेल. प्रशासकीय दप्तरदिरंगाई टाळून, प्रकल्पांसाठी लागणाऱ्या

# भारतीय संविधान, सद्यस्थिती आणि आपण : ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आत्मपरीक्षण

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत गौरवशाली, अर्थपूर्ण आणि आत्मपरीक्षणाची संधी देणारा दिवस आहे. १९५० साली याच दिवशी भारतीय संविधान अंमलात आले आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून औपचारिकरीत्या अस्तित्वात आला. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण केवळ ध्वजारोहण, संचलन, भाषणे आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता संविधानाचा आत्मा, आजची सामाजिकराजकीयआर्थिक सद्यस्थिती आणि या सगळ्या प्रक्रियेत 'आपण' म्हणजे सामान्य नागरिक म्हणून आपली भूमिका व जबाबदारी यांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन हा उत्सवाइतकाच तो अंतर्मुख होण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि नव्या संकल्पांची बांधिलकी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय संविधानाचा जन्म हा अचानक घडलेला ऐतिहासिक योगायोग नव्हता. त्यामागे शेकडो वर्षांचा सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, जातीय विषमता, स्त्रीपुरुष असमानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या लढ्याचा दीर्घ इतिहास दडलेला आहे. ब्रिटिश राजवटीखाली भारत केवळ राजकीयदृष्ट्या गुलाम नव्हता, तर सामाजिकदृष्ट्याही तो अंतर्गत विसंगतींनी, रूढीपरंपरांच्या जोखडाने आणि दारिद्र्याने ग्रासलेला होता. स्वातंत्र्यलढा हा केवळ सत्ता हस्तांतराचा संघर्ष नव्हता, तर तो माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवण्याचा व्यापक लढा होता. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि नैतिकतेच्या बळावर या लढ्याला दिशा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेला संविधानिक अधिष्ठान दिले.

संविधान सभेने जवळपास तीन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चाललेल्या सखोल चर्चांमधून भारतीय संविधानाची निर्मिती केली. जगातील विविध लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या बहुविध वास्तवाचा विचार करून हे संविधान घडवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने तयार केलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून भारतीय समाजाच्या आशाआकांक्षा, संघर्ष, वेदना आणि स्वप्नांचा जिवंत दस्तऐवज आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानाची चार मूलभूत मूल्ये आजही भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा आणि दिशा ठरवणारी शक्ती आहेत.

प्रजासत्ताक ही संकल्पना केवळ राष्ट्रप्रमुख निवडणुकीद्वारे निवडला जातो इतक्यापुरती मर्यादित नाही. प्रजासत्ताक म्हणजे सत्ता एखाद्या व्यक्तीकडे किंवा राजघराण्याकडे न राहता लोकांकडे असणे, कायद्यापुढे सर्व समान असणे आणि निर्णयप्रक्रियेत जनतेचा सक्रिय सहभाग असणे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देऊन प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिला. शिक्षण, संपत्ती, जात, धर्म किंवा लिंग यांचा विचार न करता मतदानाचा हक्क देणे ही लोकशाहीच्या इतिहासातील क्रांतिकारी पायाभरणी होती. मात्र लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सजग, चिकित्सक आणि जबाबदार नागरिकत्वात रूपांतरित होणे आवश्यक आहे.

संविधानाने दिलेले मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकांचे संरक्षणकवच आहेत. समानतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे अधिकार नागरिकांना सन्मानाने जगण्याची हमी देतात. परंतु आजच्या सद्यस्थितीत या हक्कांचा वापर करताना अनेकदा त्यांचा गैरवापर, संकुचित अर्थ लावणे किंवा राजकीय हेतूंसाठी विकृतीकरण होत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून विवेकाने व्यक्त होण्याची क्षमता होय, हे आपण पुन्हापुन्हा लक्षात घेतले पाहिजे.



आजची आर्थिक आणि सामाजिक सद्यस्थिती पाहिली असता भारत प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जात असतानाच अनेक अंतर्विरोधांना सामोरे जात आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होत आहे. मात्र या प्रगतीसोबत आर्थिक विषमता वाढताना दिसते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून मध्यमवर्गीयांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, असंघटित कामगारांचे प्रश्न हे आजही गंभीर स्वरूप धारण करून समाजासमोर उभे आहेत.

ग्रामीण आणि शहरी भारतातील असमतोल विकास ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो, तर शहरी भागात स्पर्धा, असुरक्षितता, ताणतणाव आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. स्थलांतरामुळे झोपडपट्ट्यांची वाढ, पर्यावरणीय ताण आणि सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होत आहे. संविधानाने सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा आणि अडथळे दिसून येतात.

सामाजिक पातळीवर जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, असहिष्णुता आणि द्वेषमूलक प्रवृत्ती वाढताना दिसतात. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेची हमी दिली असली तरी सामाजिक वास्तवात अजूनही भेदभाव, अन्याय आणि शोषण पूर्णपणे संपलेले नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना अजूनही हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक असमानता या समस्या प्रजासत्ताकाच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

राजकीय सद्यस्थितीचा विचार करता लोकशाही प्रक्रियेत झालेले बदल प्रकर्षाने जाणवतात. निवडणुका नियमितपणे होत असल्या तरी राजकारणात पैसा, प्रचारयंत्रणा, सोशल मीडिया आणि भावनिक मुद्द्यांचे वाढते वर्चस्व चिंताजनक ठरत आहे. संसदीय चर्चा, धोरणात्मक पारदर्शकता आणि लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्व या बाबी दुर्लक्षित होत असल्याची भावना निर्माण होते. लोकशाही केवळ सत्तांतराची प्रक्रिया नसून ती सतत जागरूक राहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि संवाद साधण्याची व्यवस्था आहे, हे आपण विसरता कामा नये.

शिक्षण व्यवस्था ही संविधान आणि सद्यस्थिती यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सुशिक्षित, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. मात्र आज शिक्षण अधिकाधिक बाजाराभिमुख, स्पर्धात्मक आणि गुणकेंद्रित होत चालले आहे. संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, नैतिकता आणि मानवी संवेदना यांचे शिक्षण दुय्यम ठरत आहे. युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव, संविधानाची ओळख आणि सामाजिक जबाबदारी रुजवणे ही काळाची गरज आहे.

स्त्री सक्षमीकरणाचा प्रश्न हा संविधान आणि सद्यस्थिती यांतील अंतर स्पष्टपणे अधोरेखित करतो. संविधानाने स्त्रीपुरुष समानतेची हमी दिली असली तरी प्रत्यक्षात स्त्रियांना सुरक्षितता, समान संधी आणि सन्मान मिळवण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो. शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकारण आणि निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढत असला तरी सामाजिक मानसिकता बदलणे ही खरी गरज आहे. स्त्री सक्षमीकरण हा केवळ महिलांचा प्रश्न नसून तो संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला विषय आहे.

आदिवासी, भटक्याविमुक्त जमाती आणि इतर वंचित घटकांच्या प्रश्नांकडे पाहिले असता विकासाच्या मुख्य प्रवाहात ते अनेकदा मागे पडलेले दिसतात. जमिनीचे हक्क, जंगलावरचा अधिकार, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी याबाबत अजूनही मोठी दरी आहे. संविधानाने दिलेल्या संरक्षणात्मक तरतुदी प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे राबवल्या जात आहेत, हा गंभीर आत्मपरीक्षणाचा प्रश्न आहे. समतामूलक समाजनिर्मितीसाठी या घटकांचा विकास केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

डिजिटल युगातील भारत ही आजची एक महत्त्वाची सद्यस्थिती आहे. तंत्रज्ञानामुळे शासन अधिक पारदर्शक झाले, सेवा सुलभ झाल्या आणि माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. मात्र त्याचवेळी खोटी माहिती, अफवा, द्वेषमूलक भाषण, ट्रोल संस्कृती आणि सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण यांचा धोका वाढला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखणे हे आजच्या लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. सजग डिजिटल नागरिकत्व ही आजच्या प्रजासत्ताकाची नवी गरज बनली आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर 'आपण' म्हणजे सामान्य नागरिकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. संविधान हे केवळ सरकार किंवा न्यायालयांसाठी नसून ते प्रत्येक नागरिकासाठी आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अनेकदा आपण समस्या फक्त सरकारकडे ढकलतो, पण नागरिक म्हणून आपली भूमिका, कर्तव्ये आणि सहभाग याकडे दुर्लक्ष करतो.

लोकशाही टिकवायची असेल तर नागरिकांनी प्रश्न विचारणे, माहिती घेणे, विवेकपूर्ण चर्चा करणे आणि सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. निष्क्रिय नागरिकत्व हे लोकशाहीसाठी घातक ठरते. सामाजिक सलोखा, सहिष्णुता, संवाद आणि बंधुता या मूल्यांची जोपासना आपल्या रोजच्या आचरणातून झाली तरच संविधान जिवंत राहील. मतभेद असू शकतात, पण ते द्वेषात किंवा हिंसेत रूपांतरित होऊ नयेत, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

जागतिक पातळीवर भारताची भूमिका वाढत असताना संविधानिक मूल्यांचा आधार घेणे अत्यंत गरजेचे आहे. शांतता, सहअस्तित्व आणि मानवतावादी दृष्टिकोन ही भारताची ओळख राहिली आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीतील संकल्पना आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत अधिकच सुसंगत ठरते. आपण जर आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहिलो तर, भारताचा प्रजासत्ताक अनुभव जगासाठी मार्गदर्शक ठरू शकतो.

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संविधान, सद्यस्थिती आणि आपण यांचा एकत्रित विचार करताना हे स्पष्ट होते की संविधानाने आपल्याला दिशा दिली आहे, सद्यस्थिती आपल्याला प्रश्न विचारायला भाग पाडते आणि 'आपण' या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची, बदल घडवण्याची आणि लोकशाही मजबूत करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. संविधान जिवंत ठेवायचे असेल तर ते केवळ ग्रंथालयात किंवा कायद्याच्या पुस्तकात नव्हे, तर आपल्या विचारात, वर्तनात आणि कृतीत उतरवावे लागेल.

शेवटी असे म्हणता येईल की भारतीय प्रजासत्ताक हे केवळ एक राजकीय व्यवस्था नसून ते एक व्यापक सामाजिक करार आहे. हा करार टिकवण्याची जबाबदारी सरकारइतकीच नागरिकांचीही आहे. संविधानाचे मूल्य, आजचे वास्तव आणि उद्याचे स्वप्न यांचा समतोल साधत जर आपण पुढे गेलो, तरच भारत खऱ्या अर्थाने समतामूलक, सशक्त, लोकशाहीवादी आणि मानवतावादी राष्ट्र बनेल. २६ जानेवारी हा दिवस आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रजासत्ताक हा केवळ साजरा करण्याचा नव्हे, तर रोज जगण्याचा, जपण्याचा आणि पुढील पिढ्यांसाठी अधिक मजबूत करण्याचा संकल्प आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत




प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम बसप्पा ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# स्वीकृत नगरसेवक पद राजकीय पातळीवर देण्यापेक्षा; सामाजिक पातळीवर दिले तर राज्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल

राज्यात व जिल्ह्यात महानगरपालिका निवडणुका झाल्यात आणि त्यातुनच नगरची सेवा करण्यासाठी नगरसेवकांची नियुक्ती झाली आहे.या नगरसेवकांना जनतेचा कौल मिळाला त्यामुळे हे नगरसेवक जनप्रतिनिधींची भूमिका निभविणार आहेत.या व्यतीरीक्त प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५ नगरसेवकांमागे १ स्वीकृत नगरसेवक अशा पध्दतीचे त्या-त्या महानगरपालिकेमध्ये अंदाजे १० किंवा कमी-जास्त स्वीकृत नगरसेवकसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.कोणाला स्वीकृत नगरसेवक करायचे हा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना असतोच यात दुमत नाही.परंतु राजकीय पक्षांसोबत जर सामाजिक कार्यातील व्यक्ती जुळली तर विकास भरभराटीला येईल. शहराच्या विकासाला खरोखरच गती यावी असे जर सरकारला वाटत असेल तर मग सामाजिक कार्यातील पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून का घेऊ नये?जिथे विकास हे ध्येय आहे. तिथे त्याग हा असलाच पाहिजे व त्यागाची भावना राजकीय पक्षांनी ठेवली पाहिजे.याकरीता थोडे राजकारण बाजूला सारून सामाजिक कार्याला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे.त्याचप्रमाणे संपूर्ण राजकीय पक्ष आपापल्या पक्षांचे उमेदवार निवडून यावे यासाठी प्रयत्नशील असतात आणि असायलाच हवे.परंतु प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असने गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या व गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत व दिल्ली पासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लेखणीच्या माध्यमातून असो अथवा आपापल्या कार्यक्षेत्राच्या माध्यमातून असो अशांचा मानसन्मान कुठेतरी व्हायला हवा व त्यांच्या कार्याची पावती त्यांना कुठेतरी पुरस्कार रूपात मिळायला हवी म्हणून स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात त्यांना मानाचे स्थान मिळायला हवे असे मला वाटते. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे.परंतु सामाजिक कार्याला एक नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व प्रशासनाने पाऊल उचलले पाहिजे.कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गूरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देवून विकासाला वेग देण्यासाठी एक नवीन पाऊल उचलने गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून एक नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची व राजकीय पक्षांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबत सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकासामध्ये मोठी भर पडेल व मदत होईल. सरकारला माझी विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा. कारण अत्याधुनिक युगात शहर, राज्य, देश सध्याच्या परिस्थितीत विकासाचा महामेरू उभा करीत आहे यात स्वीकृत नगरसेवकसेवकांच्या माध्यमातून महानगरपालिकेमध्ये सामाजिक कार्याची भर पडली तर अवश्य त्याचे सोन होईल.कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल.कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा दांडगा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्ष व सरकारने एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद.



**– रमेश कृष्णराव लांजेवार,** ( स्वतंत्र पत्रकार ) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.





## जनविकास शिक्षण संस्थेत नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन /प्रतिनिधी/** भोकरदन शहरातील जनविकास शिक्षण संस्था संचलित स्व.ड.भाऊसाहेब देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, श्री गणपती कॉलेज ऑफ डी फार्म, श्री गणपती टेक्निकल इन्स्टिट्यूशेन जोमाळा, भोकरदन मध्ये आझाद हिंद फौज चे संस्थापक व स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम नेताजींच्या प्रतिमेस संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सोपान सपकाळ उपप्राचार्य एच व्ही नागरगोजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारीवर्ग व विद्यार्थी आणि पालक यांची उपस्थिती होती.

## न्यायासाठी लेखणी उचलणाऱ्या प्रतिमा शिंदे यांना 'जनलोक वार्ता उत्कृष्ट संपादक पुरस्कार' जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर /प्रतिनिधी/** समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना निर्भीडपणे वाचा फोडणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार तथा संपादक प्रतिमा शिंदे यांना 'जनलोक वार्ता राज्यस्तरीय उत्कृष्ट संपादक पुरस्कार-२०२६' जाहीर करण्यात आला आहे. अखिल जनलोक संपादन पत्रकार संघटनेच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येणार आहे.



पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रभावी कार्य प्रतिमा शिंदे यांनी सातत्याने केले आहे. महिलांवरील अत्याचार, प्रशासकीय दिरंगाई, भ्रष्ट व्यवस्था आणि सामान्य जनतेच्या मूलभूत समस्यांवर त्यांनी केलेल्या सडेतोड व अभ्यासपूर्ण लेखनामुळे अनेक प्रकरणे उजेडात आली आहेत. त्यांच्या बातम्यांमुळे संबंधित यंत्रणांना कारवाई करावी लागली असून समाजात सकारात्मक बदल घडून आल्याचे अनेकदा दिसून आले आहे. प्रतिमा शिंदे यांनी पत्रकारितेची वाटचाल करताना अनेक अडचणी, संघर्ष आणि आव्हानांचा सामना केला. मात्र, सत्य आणि न्यायासाठी त्यांनी कधीही लेखणी म्यान केली नाही. निर्भीड, स्पष्ट आणि लोकाभिमुख पत्रकारिता हीच त्यांची ओळख बनली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अखिल जनलोक संपादन पत्रकार संघटनेचे संस्थापक राज शिंगाडे यांनी पुरस्कार जाहीर करताना सांगितले.

## मतदार जनजागृती उपक्रमांची राज्य निवडणुक आयुक्तांकडून वाखाणणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार जनजागृती उपक्रमांची आज राज्य निवडणुक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पाहणी केली व या उपक्रमांची वाखाणणी करुन जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज सकाळी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी भेट दिली. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी लातूर श्रीमती वर्षा ठाकुर, राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव सुर्या कृष्णमुर्ती, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगिता राठोड, तहसिलदार दिनेश झांपले आदी यावेळी उपस्थित होते. श्री. वाघमारे यांच्या हस्ते मतदार जनजागृती चित्ररथास हिरवी झेंडी दाखवण्यात आली. त्यानंतर हा रथ रवाना करण्यात आला. त्यानंतर श्री. वाघमारे यांच्या समोर मतदार जनजागृती पोवाडा, पोतराज व गोंधळ सादर करण्यात आला. तसेच मतदार जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रचार सामुग्रीचे त्यांनी अवलोकन केले.

यासर्व उपक्रमांबद्दल श्री. वाघमारे यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, मतदारांमध्ये अधिकाधिक जनजागृती होऊन त्यांना आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करावे व मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सर्व निवडणूक यंत्रणेने प्रयत्न करावे,असे आवाहन त्यांनी केले.

## हिंद दी चादर गुरु तेग बहादुर शहीदी समागमसाठी २५० जणांची संगत नांदेड कडे रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि.२४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात देशभरातून भावि सहभागी होत आहेत. छत्रपती संभाजीनगर येथूनही गुरुद्वारा गुरु सिंग सभा येथून २५० जणांची पहिली संगत आज रवाना झाली. या संगतला स्थानिक भाविकांनी रवाना केले. आणखीन मोठ्या संख़्येने भाविक नांदेड येथे जाणार आहेत. या भाविकांची तेथील निवास, भोजन, विश्रांती, पार्कींग आदी सुविधा करण्यात आली आहे. लंगर सेवेतही योगदान देण्यात आले आहे. सरदार हरिसिंग, सरदार कुलदीपसिंग निर्थ, अवतारसिंग छाबडा, रणजितसिंग मलिक, इंदरजितसिंग छटवाल, हरविंदरसिंग मुछल आदी गुरुद्वारा समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## प्रख्यात तत्त्वज्ञ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा जागर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** २७ व २८ जानेवारीला राष्ट्रीय परिषदछत्रपती संभाजीनगर:भारतीय प्रबोधनाचे अग्रणी विचारवंत, प्रख्यात तत्त्वज्ञ आणि ज्ञानकोशकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शतकोत्तर रौप्य जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी शहरात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारतीय प्रबोधन आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' या विषयावर आधारित ही परिषद दि. २७ व २८ जानेवारी २०२६ रोजी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या वंदे मातरम सभागृहात संपन्न होईल.संयुक्त आयोजन आणि उद्देशया परिषदेचे आयोजन शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाचा इतिहास विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खट-उ), भारतीय तत्त्वज्ञान अनुसंधान परिषद (खउझठ) नवी दिल्ली, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान (वाई) आणि प्रागतिक इतिहास संस्था (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तर्कतीर्थांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या प्रगाढ ज्ञानसाधनेचा चिकित्सक आढावा घेणे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.उद्घाटन आणि प्रमुख उपस्थितीपरिषदेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. पंकजा वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शनदोन दिवस चालणाऱ्या या वैचारिक मंथनात विविध विषयांवर तज्ज्ञ मांडणी करतील:बीजभाषण: सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. नीरज हातेकर हे परिषदेचे बीजभाषण करतील.डॉ. शरद बाविस्कर: 'भारतीय प्रबोधनाचा पेच व तर्कतीर्थ'.डॉ. उमेश बगाडे: 'तर्कतीर्थांची हिंदु धर्ममीमांसा'.डॉ. राहुल कोसंबी: 'सर्वधर्ममीमांसा'.डॉ. निर्मला जाधव व आरती कड: 'तर्कतीर्थांच्या लिखाणातील लिंगभाव व समानतेचा लढा'.परिषदेचा समारोप ज्येष्ठ अभ्यासक व तर्कतीर्थांच्या साहित्याचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या भाषणाने होईल.सहभागाचे आवाहनया परिषदेच्या माध्यमातून तर्कतीर्थांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित होणार असून, जास्तीत जास्त प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि जिज्ञासू नागरिकांनी या ज्ञानयज्ञात सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवल थोरात यांनी केले आहे.महत्त्वाची माहिती एका दृष्टिक्षेपात:तपशीलमाहितीविषयभारतीय प्रबोधन आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीदिनांक२७ व २८ जानेवारी २०२६स्थळवंदे मातरम सभागृह, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरउद्घाटकडॉ. विजय फुलारी (कुलगुरू, डॉ. बा. आ. म. विद्यापीठ)

## प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदेड येथे आंतर-विभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** प्रजासत्ताक दिन २०२६ च्या औचित्याने नांदेड येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) कार्यालयात आंतर-विभागीय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण १३ विभागांनी या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांमधील संघभावना व आपुलकीचे दर्शन घडले. या क्रीडा महोत्सवांतर्गत क्रिकेट, व्हॉलीबॉल, दोरीखेच, बॅडमिंटन, कॅरम व बुद्धिबळ या प्रमुख स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत : क्रिकेट : विजेता – ट्रॅक्शन रोलिंग स्टॉक ऑपरेशन्स (TRSO) विभाग उपविजेता – अभियांत्रिकी विभाग व्हॉलीबॉल : विजेता – यांत्रिकी विभाग उपविजेता – ऑपरेटिंग विभाग दोरीखेच : विजेता – रेल्वे संरक्षण दल (RPF) उपविजेता – कार्मिक विभाग तृतीय क्रमांक – TRSO विभाग बुद्धिबळ (पुरुष) : प्रथम क्रमांक – वाणिज्य विभाग द्वितीय क्रमांक – ढठडज विभाग

बुद्धिबळ (महिला) : प्रथम क्रमांक – सिग्नल व दूरसंचार (ST) विभाग द्वितीय क्रमांक – कार्मिक विभाग कॅरम (महिला) – एकेरी : प्रथम क्रमांक – कार्मिक विभाग द्वितीय क्रमांक – ऑपरेटिंग विभाग कॅरम (महिला) – दुहेरी : प्रथम क्रमांक – सिग्नल व दूरसंचार (ST) विभाग द्वितीय क्रमांक – ऑपरेटिंग विभाग या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री प्रदीप कामले यांनी उपस्थित राहून स्पर्धांचा आनंद घेतला तसेच सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन देत त्यांच्या क्रीडावृत्तीचे कौतुक केले. यावेळी विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. या क्रीडा स्पर्धांमुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच विविध विभागांतील कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय, संघभावना व परस्पर समज वाढीस लागली असून, प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात आणखी ४ तलाठी अटकेत आर्थिक गुन्हे शाखेची कामगीरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते.त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबंधीत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी चौकशी समीती गठीत केली होती.

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात २२ तलाठी, तहसिल कार्यालयातील नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन विभागातर्गत कामकाज करणारे ०५ कर्मचारी व

## न्यायालयाकडुन ५ दिवसाची पोलीस कोठडी मंजुर, आज पर्यंत २४ आरोपी अटक

जिल्हाधिकारी कार्यालय येथे नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन कार्यालयात काम करणारा १ असे एकुण २८ आरोपी विरुध्द पो.स्टे.अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ६१(२), ३(५) इछड सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर प्रकरणात गुन्हा नोंद झाले पासुन आरोपी फरार झाले होते ते पोलीसांचे नजरेआड राहत होते.आरोपी पोलीस शोध घेऊन नये या साठी मोबाईल वापरत नव्हते तसेच सोशल मिडीया पासुन सुध्दा लांब राहत होते. त्यामुळे त्यांचे अटकेसाठी अडसर येत होते तरी सुध्दा त्यांचा शोध घेत आर्थिक गुन्हे शाखेने यापुर्वी एकुण २० आरोपीना अटक केली आहे.

गुन्हयातील आरोपी हे गुन्हा नोंद झाल्यापासुन पोलीसांचे नजरे आड राहत आरोपीतानी प्रथम मा.जिल्हा व सत्र न्यायालय अंबड येथे अटकपुर्व जामीन साठी अर्ज सादर केले होते.ते अर्ज फेटाळुन लावल्यानंतर आरोपी हे उच्च न्यायालय महाराष्ट्र राज्य मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे अटकपुर्व जामीन मिळावा या साठी अर्ज सादर केले होते सदर प्रकरणात तपास अधिकारी यांनी गुन्हयात सखोल तपास करुन पुराव्यानिशी कागदपत्रे मा.न्यायालयात वेळेत सादर केल्याने मा.न्यायालयाने वेळोवेळी सुनावणी घेऊन आरोपीचे सर्वच अटकपुर्व जामीन अर्ज फेटाळलेले आहेत.

गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना आरोपी आरोपी नामे १.विनोद जयजयराम ठाकरे वय ४३ वर्षे, रा. श्रीकृष्णनगर अंबड रोड जालना २.कृष्णा दत्ता मुजगुले वय ३५ वर्षे, रा.ढालसखेडा ता. अंबड जि. जालना ३.गणेश ऋषींदर मिसाळ वय ३४ वर्षे, रा.दुधनाकाळेगाव ता.जि.जालना ४. दिगंबर गंगाराम कुरेवाड वय ५५ वर्षे, महालक्ष्मी रेसीडेंसी चौधरी नगर जालना यांना आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात येऊन त्यांना मा.न्यायालयासमक्ष मध्ये हजर केले असता मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अंबड कोर्ट २ रे यांनी आरोपीना ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. आज रोजी पावेतो नमुद गुन्हयात २४ आरोपीना अटक करण्यात आली असुन इतर फरार आरोपी व एंजटचा शोध सुरु आहे.

सदरची कामगीरी ही मा.श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक जालना,श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना,श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना,पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे,समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण,अंबादास साबळे,गजु भोसले, सागर बावीस्कर,दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे (माऊली),ज्ञानेश्वर खुने,रविंद्र गायकवाड,शुभम तळेकर,श्रेयस वाघमारे,चालक पाठक मेजर, महिला अंमलदार,जया निकम,निमा घनघाव,मंदा नाटकर यांनी पार पाडली आहे.

## संक्षिप्त

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व मत्स्योदरी महाविद्यालय,अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने सुखापुरी येथे विशेष शिबिराचा समारोप



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** सुखापुरी येथे आयोजित सात दिवसीय शिबिराच्या समारंभात प्रमुख अतिथी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सतीश होंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा, श्रमसंस्कार शिकवते,त्यांना निसर्गाच्या सानिध्यात राहून नवी ऊर्जा देणारी असते.असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित होते.रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.रमेश वाघमारे, सरपंच भगवानराव राखुंडे,उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर उबाळे,स्टाफ सेक्रेटरी डॉ.राम रौनेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ.रविराज कटारे, प्रा.दिपक राखुंडे,प्रा.रवींद्र पैठणे,प्रा.जानकी कुर्तडीकर, प्रा.संपत पवार,प्रताप राखुंडे,अंकुश लहुटे,रईस बागवान,फकिरमहंमद बागवान यांच्यासह प्राध्यापकवृंद,ग्रामस्थ व विद्यार्थी स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिपक राखुंडे यांनी केले तर आभार प्रा.संपत पवार यांनी मानले.

### परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने स्वच्छता व साफसफाई मोहिमेचे आयोजन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे नगरसेवक पदी प्रथमच निवड झाल्यानंतर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने स्वच्छता व साफसफाई मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेद्वारे चौक व आजूबाजूच्या परिसरातील कचरा हटवून स्वच्छता करण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेत नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशिला दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधानी, श्री. कल्याण भदनेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच स्वच्छता प्रमुख श्री. चाको, श्री. गणेश सुतार व स्वच्छता विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक श्री.भास्कर आबा दानवे नागरिकांना स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले असून, प्रभागातील सर्व परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला. या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले असून, नगरसेवकांच्या या पुढाकाराबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

### राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत ५२ व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन - २०२५या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी 'ग्रंथभेट' योजने अंतर्गत सन २०२५या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या 'शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ या कॅलेंडर वर्षात (दि. १ जानेवारी, २०२५ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत (Complimentary copy) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

दि. २८ फेब्रुवारी, २०२६ नंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन २०२६ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.

तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जालना जिल्ह्यातून हिंद-की-चादर कार्यक्रमासाठी विविध माध्यमातून मदत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** हिंद-की-चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमवर्षानिमित्त नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या ऐतिहासिक कार्यक्रम जिल्ह्यातील जास्तीत-जास्त भाविकांना उपस्थित राहता यावेह यासाठी जालना जिल्हा प्रशासनामार्फत विविध माध्यमतून व्यापक प्रचार प्रसिध्दी मोहिम राबविण्यात आली.

यामध्ये २,४४४ प्राथमिक, माध्यमिक व उच्चव माध्यरमिक शाळा व महाविद्यालय मध्येल दररोज प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी जालना शहरात आयोजित करण्यात आलेल्या महारॅलीत सुमारे १० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्येद श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत व माहितीपट दाखवण्याहत आला. तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये निबंध/वत्कृात्वि/ चित्रकाला स्पोर्धाचे आयोजन करुन जिल्ह्या तील एकूण १५ विजेत्यांरची व ५ संस्थोची निवड करण्याात आली आहे. जालना जिल्ह्यातील सर्व शहरामध्येय व गावांमध्ये हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे होर्डींग लावण्याति आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सिनेमागृहात श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत व माहितीपट दाखवण्यातत आला. हा ऐतिहासिक कार्यक्रमाच्याह यशस्वीख आयोजनासाठी जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व समाजातील दानशुर व्य क्तींलची जिल्हा धिकारी आशिमा मित्तल यांनी वेळोवळी बैठका घेवून कार्यक्रमासाठी मदत करण्या चे आवाहन केले होते. त्या नुसार जालना जिल्ह्यातील उद्योगपती, व्या पारी व इतर नागरीकांनी भरीव स्वकरुपाची मदत केली असुन, सदर मदत नांदेड येथे पोहचविण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी जालना जिल्ह्यातून जाणाऱ्या स्वचयंसेवकांना व्याुपारी महासंघातर्फे टि शर्ट पुरविण्या त आले आहे. तसेच इतरही नागरीकांनी स्वाखर्चाने नांदेड येथे किराणा मालाचे साहीत्यं पोहोच केले आहे. या कार्यक्रमासाठी भाविकांना जाणे-येण्यासाठी प्रशासनामार्फत वाहनांची देखील व्यावस्थाल करण्याआत आलेली आहे. या भव्य ऐतिहासिक कार्यक्रमास जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हारधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# एम एस एस अभियांत्रिकी महाविद्यालयात कौशल्य विकास व करिअर समुपदेशन मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना येथील एम एस एस अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करीअर सेंटर जालनाद्वारे कौशल्य विकास व करिअर समुपदेशन या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सुमारे १०० पेक्षा विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस के बिरादार हे होते. एम एस एस तंत्रनिकेतन उपप्राचार्य श्री. दवणे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून डॉ. अमोल परिहार (समन्वयक, मॉडेल करिअर सेंटर, जालना) व श्री. कैलास काळे (जिल्हा कौशल्य विकास सहायक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना) यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कैलास काळे यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालय यामध्ये सुरू असलेले अल्पमुदतीचे रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम (STEP) याबाबत माहिती दिली. तसेच, कौशल्य विकास कार्यालयामर्फत जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या विविध योजना संदर्भातील माहिती देत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनासह विविध कौशल्य विकास योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अमोल परिहार यांनी नॅशनल करिअर सर्व्हिस (NCS) व केंद्र शासनाच्या नौकरीकरिता विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी, करिअर पर्याय व नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दवणे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. प्रविण भाकडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# प्रधानमंत्री सुक्ष्म व अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतंर्गत जिल्हा संसाधन व्यक्ती यांचे सेवा विविक्षित कामांसाठी घेण्याबाबत अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** आत्मनिर्भर भारत पंकज अंतर्गत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्य नोडल एजन्सीच्यावतीने जिल्हास्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा, हाताळणी सहाय्य देण्यासाठी संसाधन व्यक्तीची नामिकासुची तयार करावयाची आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि.२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, बवत भवन, मोतीबागेसमोर, जालना येथे प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत.

पदनाम -संसाधन व्यक्ती शैक्षणिक अर्हता -सर्व प्रकारच्या पदवीधारकांना आणि ज्यांना सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे ज्ञान व अनुभव (DPR) असलेले उमेदवार.

अनुभव -अन्न प्रक्रिया उद्योगांना तंत्रज्ञान विकसन वृध्दी, नवीन उत्पादन विकसित करणे, उत्पादांच्या गुणवत्तेची हमी, अन्न सुरक्षा व्यवस्थापन यासाठी सल्ला देण्यासंदर्भात ३ ते ५ वर्षाचा अनुभव.

संसाधन व्यक्तींना त्यांनी प्रत्येक लाभार्थ्यांना बँक कर्ज मिळवून देण्याच्या दृष्टीने ने सहाय्य केले त्यानुसार मोबदला दिला बाईल संसाधन व्यक्तीस मंजुरीनंतर प्रती बैंक कर्जासाठी रु २०,००० (अक्षरी-वीस हजार रु.) देण्यात येतील त्यापैकी ५०% रक्कम हि बैंक कर्ज मंजुरीनंतर व उर्वरीत ५०% रक्कम संबंधित उद्योगास उद्योग आधार, जीएसटी नोंदणी, आधार नोंदणी एफएसएसएआय ची उत्पादन मानके दर्जा पूर्तता उद्योगाची कार्यवाही व लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर अदा केली जाईल याव्यतिरिक्त मार्गदर्शक सूचना, सविस्तर पात्रता पारिश्रमिक व इतर मानधन) अटी व शर्ती या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांचे कार्यालयात व योजनेच्या www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सिंचन क्षमतेसाठी जलसाठ्यांची प्रगणना करण्यासाठी संस्थेना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** केंद्र शासनाकडून आलेल्या शासन निर्णयान्वये राष्ट्रव्यापी लघु सिंचन योजनांची (० ते २ हजार हेक्टर) सिंचन क्षमता ७ वी प्रगणना आणि जलसाठ्यांची २ री प्रगणना करण्यात येत आहे त्यामध्ये खालील योजनेचा समावेश होणार आहे.

भूपृष्ठाखालील जलसाठ्याच्या वापरासाठी योजनाः साध्या विहिरी, उथळ, मध्यम व खोल कुपनलिका.भूपृष्ठावरील जलसाठ्याच्या वापरासाठी योजनाः: ०-२००० हेक्टर सिंचन क्षमतेचे लघु सिंचन योजना, धरण, कालवे, बंधारे, विमोचक, बंद नलिका वितरण प्रणाली इत्यादिमुळे केले जाणारे प्रवाही सिंचन आणि नदी, नाले, बंधारे, जलाशय इत्यादिवरील उपसा सिंचन योजना.नागरी आणि ग्रामीण भागातील जलसाठे (वॉटर बॉडीज) व २००० हेक्टर वरील सिंचन क्षमतेचे मोठे व मध्यम प्रकल्प आणि उपसा सिंचन योजना इत्यादि. कृषि व मृदसंधारण विभागाकडील सिमेंट बंधारे, शेततळे, सिंचन विहीरी इत्यादि. भूजल सर्वेक्षण यंत्रणे संबंधित कुपनलिका इत्यादि.

सदरील प्रगणना च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यामध्ये काम करण्याकरिता इच्छुक संस्थाने दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत आपले प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग जालना या कार्यालयास सादर करण्यात यावे. तद्नंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत. तसेच अनुभवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.तसेच उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात यावे सदरील प्रगणना दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

प्राप्त प्रस्तावा वरती साधक बाधक चर्चा करून संस्थेची निवड करण्यात येईल व अंतिम निर्णय हे जिल्हा सनियंत्रण समिती प्रगणना जालना यांच्याकडे राखीव राहतील.अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधाण्याचे आवाहन जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# राष्ट्रविकासात युवकांची भूमिका आणि योगदान महत्वाचे: आ.राजेशभैय्या टोपे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** युवा पिढीला शिकवण देण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेतून मिळते.युवकांनी कोणत्याही कामाला कमी लेखू नये.तसेच तरुण पिढीने समाजातील अनिष्ट रूढी,परंपराना छेद देण्याचे काम करून राष्ट्रविकासात महत्वाची भूमिका पार पाडावी आणि आपले योगदान द्यावे असे आवाहन माजी आरोग्य मंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.राजेशभैय्या टोपे साहेब यांनी केले.




डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर आणि अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने खरपूडी ता.जि. जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय शाश्वत विकासासाठी जलसंधारण या विशेष श्रमदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी बोलताना राजेश टोपे असे म्हणाले की,राष्ट्रीय सेवा योजना श्रमाला प्रतिष्ठा व सन्मान मिळवून देते.तरुणांनी मानवताधर्म जपण्याचे काम करावे,स्वप्रयत्नवार आपले करिअर आणि नावलौकिक कमवावा. तरुण पिढीने व्यसनाच्या आहारी जाऊ नये, चांगली संगत ठेवावी. वाचन करावे,आपल्या बुद्धीला चालना देऊन आई- वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे.

यावेळी जालना जिल्हा रा.से.यो. विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.रमेश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाज सेवेचे काम करावे असे ते म्हणाले.या सात दिवसीय शिबिराचे अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा.अविनाश भालेराव यांनी केले.यावेळी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे सहा.प्रशासकीय अधिकारी श्री.राहुल भालेकर,खरपूडी येथील अरुण गिरी,उपसरपंच भरत शेजूळ,शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सुरेश गिरी,समाधान खरात,रावसाहेब देठे,मुकुंद निकाळजे,श्री किशोर शिंदे,चत्रभुज शेजूळ,संदीप दरेकर,म्हस्के यासोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस,उपप्राचार्य डॉ संजय पाटील,कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण, महाविद्यायातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. अविनाश भालेराव,डॉ.मसूद अन्सारी,डॉ.बद्रीनाथ शिंदे,प्रा.मनोरमा पात्रे,रघुनाथ शिंदे,अंकुश शिंगाडे,विठ्ठल पवार,भारत बर्डे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बद्रीनाथ शिंदे यानी केले तर आभार डॉ.मसूद अन्सारी यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813